# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१६/ २०१५** **दिनांक २०.०८.२०१५**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २०.०८.२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २८६३/ २०१५, दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक २०.०८.२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं०१.** **दिनांक ०६.०८.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२७३** दिनांक ०६.०८.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्याहोत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं०२.** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना चालविणेस दिलेले कियॉस्क/ गाळे यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि.,शिर्डी यांना संस्थानचे मान्यतेने संस्थान परिसरात साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी क्लोकरुम, मोबाईल कॅमेरा क्लोकरुम, पादत्राणे गृह, प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर तसेच थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॉल चालविणेस व तात्पुरते व्यवसाय करणेसाठी खालील ठिकाणी चालविणेस दिलेले १४ कियॉस्क वापराची मुदत दि६/१२/२०१४ रोजी संपलेली आहे.

| अ.नं. | ठिकाण | कियॉस्क संख्या |
|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग-१ परिसर | ४ |
| २ | साईआश्रम भाग-२ परिसर | १ |
| ३ | साई प्रसादालय परिसर | १ |
| ४ | व्दारावती निवासस्थान परिसर | २ |
| ५ | साईउद्यान परिसर | २ |
| ६ | साईप्रसाद निवासस्थान परिसर | १ |
| ७ | साईबाबा निवासस्थान परिसर | ३ |
| | एकूण | १४ |

साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी सदर व्यवसाय व कियॉस्क चालविणेसाठी पुढील पाच वर्षाकरीता मुदवाढ मिळावी अशी विनंती चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि. यांनी केलेली आहे.

संस्थान अधिनियम 2004 मधील कलम 17 (3) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेलत्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही.

मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांनी जनहित याचीका क्र18/2011 मधील सिव्हील अर्ज 12056/2012 मध्ये दि.16/10/2012 रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहे.

क्लॉज नं.6 we direct that, without prior permission of this Court, the Committee.

a) Shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2 trust;

b) Shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2 trust;

तसेच संजय भा.काळे यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.२५/२०१२ मध्ये उपस्थित १४ मुद्दयांमध्ये मंदिर परिसरातील गाळयांचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. याबाबत न्यायालयीन आयोगासमोर चौकशी सुरु आहे.

मा.कार्यासन अधिकारी यांचेकडील दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्राने संस्थानने करावयाची कार्यवाही/ उपाययोजना याबाबत सविस्तर विवरणपत्र देवून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.सोसायटीचे पेढा विक्रीबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करणेबाबत सुचीत केले आहे.

१) व्यवस्थापन समितीच्या ठरावानुसार व मंदिर परिसरात भक्तांची जास्त गर्दी होवू नये तसेच सुरक्षिततेच्या कारणास्तव मंदिर परिसरातील सोसायटीस देण्यात आलेले ६ स्टॉल बंद करण्यात यावेत व ते संस्थानने स्वत:च्या ताब्यात ठेवावे.

२) जुने प्रसादालय परिसरात व अन्य कोणत्याही परिसरात सोसायटीस स्टॉल द्यावयाचे झाल्यास जाहिरात/ निविदा पध्दतीचा अवलंब करुन सर्वात जास्त रक्कमेची ऑफर स्विकारुन स्टॉल्स देण्यात यावे.

३) सोसायटीमार्फत विक्री केल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थाची अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करुन घेणे सोसायटीस बंधनकारक करण्यात यावे.

४) मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यासाठी सोसायटीकडून अतिशय नाममात्र परवाना फी घेण्यात येत असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सोसायटीकडून काढून घेण्यात यावे व त्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात याव्यात.

५) मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यास सोसायटीस दिल्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मा.जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर व मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत याबाबत सविस्तर चौकशी करण्यात यावी व त्यांच्या अहवालानुसार व शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

६) कर्मचाऱ्यांच्या सदर सोसायटीस संस्थानकडून वीज, पाणीपुरवठा या वा अन्य काही सुविधा पुरविल्या असल्यास त्यांचा भरणा सोसायटीने केलेला आहे किंवा कसे, याबाबतही कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन व संबंधीतांकडून सदर रक्कमेची वसुली करुन तसा अहवाल तात्काळ राज्य शासनास सादर करावा.

उपरोक्त प्रमाणे जनहित याचिका क्र.२५/२०१२ मध्ये उपस्थित मुद्यांबाबत संस्थानने करावयाची कार्यवाही/उपाययोजना बाबत शासनाने कळविले आहे.

त्यास अनुसरुन मंदिर परिसरातील ६ स्टॉल दि.६/१२/२०१३ पासून संस्थानचे इतर परिसरात स्थलांतरीत केले आहे. त्याबदल्यात संस्थान परिसरात ७ ठिकाणी १४ कियॉस्क वापरासाठी दिले आहेत. नव्याने स्टॉल दिलेले नाहीत.

सोसायटीस व्यवसाय करण्यासाठी चालविण्यास दिलेले कियॅास्क/गाळे यांची मुदत संपुष्टात आल्याने चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी यांनी मुदतवाढीबाबत प्रस्ताव सादर केलेले आहेत.

सदर प्रकरणी मुदतवाढीबाबत इतर शासकीय संस्थेच्या कर्मचारी संघटनांना कशा प्रकारे परवानगी दिली जाते याबाबत माहिती उपलब्ध करुन त्यानुसार संस्थानकडे प्रस्ताव दाखल करणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी यांना मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी समक्ष चर्चेमध्ये सांगितलेले आहे.

चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी यांनी दि.२९/४/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, शासकीय कर्मचा-यांचे कर्मचारी को.ऑप.क्रेडिट सोसायटी यांना शासनाचे त्या-त्या अस्थापनेने त्यांचे जागेतच शासनाचे प्रचलित दरानुसार करारांवर जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्याच धर्तीवर संस्थेसही समाधी मंदिराचे परिसरात साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी वार्षीक करारांवर भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन द्याव्यात ही विनंती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने महाराष्ट्र शासन निर्णय क्र.शाकाजा-१११३/ प्र.क्र.२६/ २०१३/२२ नुसार मुंबई येथील महाराष्ट्र शासनाचे मंत्रालय इमारतीचे परिसरात दि.महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को.ऑप.बॅंक लि.तसेच दि.महाराष्ट्र मंत्रालय व संलग्न कर्मचारी को.ऑप.क्रेडिट सोसा.लि.यांची कार्यालये शासनाचे प्रचलित दरानुसार जागा भाडे करारानुसार चालु आहेत. शिवाय सदरचे ठिकाणी इमारत पुर्नबांधणीचे काम सुरु असल्याने उपरोक्त कर्मचारी को.ऑप.क्रेडिट सोसायटीची कार्यालये शासनाचे आकाशवाणी आमदार निवास येथे तात्पुरत्या स्वरुपात इमारत पुर्नबांधणी होईपर्यत स्थलांतरीत करणेबाबतचा आदेश सोबत जोडला आहे. याच धर्तीवर संस्थेस समाधी मंदिराचे परिसरात साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थानचे नियम व अटीस अधिन राहुन भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन द्यावी ही नम्र विनंती.

मुंबई येथील महाराष्ट्र शासनाचे मंत्रालय इमारतीचे परिसरात दि.महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाइड ऑफिसेस को.ऑप.बॅंक लि.तसेच दि. महाराष्ट्र मंत्रालय व संलग्न कर्मचारी को. ऑप. क्रेडिट सोसा.लि. या संस्थांना शासनाने ज्याप्रमाणे शासकीय जागेतच स्वतंत्र निर्णय घेऊन मा.राज्यपाल यांचे आदेशाने सुधारीत दराने रु३२.१२ प्रति चौ.फुट व त्यात प्रतिवर्षी ५ टक्के दरवाढ व इतर अटीस आधीन राहुन जागा भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. त्याच प्रमाणे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सोसायटी लि. शिर्डी या संस्थान कर्मचा-यांचे संस्थेसही श्री साईबाबांचे समाधी मंदिराचे परिसरात व संस्थान परिसरात अकरा-अकरा महिन्यांचे लिव्ह ॲण्ड लायसेन्सी तत्वानुसार संदर्भिय पत्रातील शासन निर्णयानुसार भाडे आकार आकारुन जागा उपलब्ध करुन देण्यात यावी हि नम्र विनंती.

सदरचे पत्रासोबत शासन निर्णय क्र.शाकाजा-१११३/प्र.क्र.२६/२०१३/२२ दि.२२ एप्रिल,२०१३ ची प्रत जोडलेली आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि.,शिर्डी यांना चालविण्यास दिलेले कियॅास्क वापराची मुदत संपलेली असल्याने पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणेकामी

१. संस्थान अधिनियम 2004 मधील कलम 17 (3) मधील तरतुद.

२. मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र18/2011 मधील सिव्हील अर्ज 12056/ 2012 मध्ये दि.16/10/2012 रोजी दिलेले निर्देश.

३. संजय भा.काळे यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.२५/२०१२ मध्ये उपस्थित १४ मुद्दयांमध्येमंदिर परिसरातील गाळयांचा मुद्दा

४. मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्राने याबाबत संस्थानने करावयाची कार्यवाही /उपाययोजना.

५. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.शाकाजा-१११३/प्र.क्र.२६/२०१३/२२ नुसार मुंबई येथील महाराष्ट्र शासनाचे मंत्रालय इमारतीचे परिसरात दि.महाराष्ट्र मंत्रालय अॅण्ड अलाईड ऑफिसेस को.ऑप.बँ कलि. तसेच दि.महाराष्ट्र मंत्रालय व संलग्न कर्मचारी को.ऑप.क्रेडिट सोसा.लि.यांची कार्यालये शासनाचे प्रचलित दरानुसार जागा भाडे/ करार.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि.,शिर्डी

यांना वापरास दिलेले संस्थान परिसरातील १४ कियॉस्क चालविणेस मुदतवाढ देणेबाबत खालील मुद्दयांवर निर्णय होणेसाठी सादर.

अ) १४ कियॉस्क दि.७/१२/२०१४ ते दि.६/१२/२०१५ या एक वर्ष कालावधीसाठी वापरास देणेकामी शासनाचे मंजूरीस प्रस्ताव सादर करुन मुदतवाढ देणेबाबत मान्यता घेणे.

किंवा

ब) दि.२८/१०/२०१३ रोजीचे शासनाचे पत्रास अनुसरुन १४ कियॉस्क वापरास देणेकामी निविदा प्रक्रिया राबविणे व सदर प्रक्रिया पुर्ण होईपावेतो मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन मागील अटी शर्तीवर चालविण्यास देणेबाबत निर्णय होणे.

किंवा

क) निविदा प्रक्रिया न करता शासनाची मान्यता प्राप्त होईपावेतो सदर १४ कियॉस्क बंद ठेवणे.

वरील प्रमाणे १४ कियॉस्क वापराची मुदत संपुष्टात येऊन बराच कालावधी झालेला आहे. पुढील मुदतवाढ दिलेली नसल्याने करारनामा ही झालेला नाही. सदर १४ कियॉस्क पुर्ववत सुरुआहेत. याबाबत काही कायदेशीर बाब उद्भवल्यास अडचणीचे ठरु शकते. त्यामुळे सदर प्रकरणी वरीलपैकी निर्णय तातडीने घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.**

**तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना चालविणेस दिलेले कियॉस्क/ गाळे यांना त्यांची मुदत संपलेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा शासन आदेश येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विद्युत बील मिटर रिंडीग प्रमाणे वेगळे आकारण्यात येऊन मागील अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं०.३** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना स्नानगृह या व्यवसायास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समितीचे दि.०९/१०/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९०३ अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोड लगत) या व्यवसायास दि.०१/११/२०१४ ते दि.३१/१०/२०१५ या कालावधीसाठी पुर्वीचेच अटी/शर्तीवर मागील परवाना फी रु.१०,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.११,०००/- व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेत यावी असे ठरले.

तसेच सिव्हील अॅप्लीकेशन नं.३६८६/२०१४ अन्वये मा. उच्च न्यायालयाने दि.०२/०५/२०१४ रोजीचे खालील प्रमाणे आदेशान्वये जागा वापरास देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त परवानगीने तसेच दि. ०९/१०/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. ९०३ अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना दि.०१/११/२०१४ ते दि.३१/१०/२०१५ अखेर १२ महिने कालावधीसाठी इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/ ३९३२/२०१४ दि.१८/११/२०१४ अन्वये मागील परवाना फी रु.१०,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रु.११,०००/- व विद्युत

बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढीचा आदेश देण्यात आलेला असून त्यांचेकडून करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. तसेच भक्तांकडून गरम पाण्यासाठी प्रति बादली रु.३/- आकारणेबाबत सोसायटीस ठरवून दिलेले आहे. त्याची मुदत दि.३१/१०/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांनी जा.नं. श्रीसासंएक्रेसो/१०९/२०१५ दि.१८/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थानचे जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोडलगत) येथे चालवत असलेल्या स्नानगृह या व्यवसायाची मुदत दि.३१/१०/२०१५ रोजी पुर्ण होत असल्याने साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसायास संस्थेस पुढील पाच वर्षाकरीता चालविण्यास मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

संस्थानचा अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही."

तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ पी.आय.एल.नं.१८/२०११ मध्ये दि.१६ आक्टोबर,२०१२ रोजी समितीला खालील प्रमाणे आदेश दिले आहे.

(6) We direct that, without prior permission of this court, the Committee-

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust:

त्यात मा. कोर्टाच्या परवानगीशिवाय संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे ति-हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये असा आदेश झालेला आहे

परंतु सिव्हील ॲप्लीकेशन नं.३६८६/२०१४ मधील मा. उच्च न्यायालयाचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन (Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decision) लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर मा.त्रिसदस्य समिती सभेचे मान्यतेने मुदतवाढ देता येईल.

वरील बाबी विचारात घेता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचे दि.१८/०७/२०१५ रोजीचे पत्रास अनुसरुन सोसायटीस जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोडलगत) पुढील एक वर्षाकरीता मागील मासिक परवाना फी रु.११,०००/- मध्ये १०% वाढ करुन (रु.११०००/- + १०% रक्कम रु.११००/- = रु.१२१००/-) रु.१२,१००/- (अक्षरी रु.बारा हजार शंभर मात्र) व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन गरम पाणी पुरविणेचे व्यवसायास दि.०१/११/२०१५ ते दि.३१/१०/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.**

**तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना स्नानगृह या व्यवसायास त्यांची मुदत संपलेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा शासनआदेश येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विद्युत बील मिटर रिंडीग प्रमाणे वेगळे आकारण्यात येऊन मागील अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं०.४** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि., शिर्डी हे स्वागतकक्ष येथे चालवत असलेल्या क्लोकरुमला मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सोसायटी साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी बसस्टॅन्ड समोरील संस्थान मालकीचे जुने स्वागतकक्षाचे जागेत क्लोकरुम चालवत असुन सदर क्लोकरुम चालविण्याची मुदत दि.२१/१/२०१५ रोजी संपलेली असल्याने पुढील पाच वर्षासाठी क्लोकरुम चालविण्याची मुदतवाढ मिळणेस सोसायटीने दि.५/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सोसायटी यांना दि.२१/३/२०१३ पासून पुढे पाच वर्ष कालावधीसाठी लिव्हअॅन्ड लायसन्स फी मध्ये प्रति वर्षी १० टक्के वाढ करुन मुदतवाढ देण्यात यावी. मात्र त्यांचेबरोबर करारनाम्याचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण करुन घेणेत यावे. तसेच तत्पुर्वी याकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/७८९/२०१४ दि.१५/५/२०१४ रोजीचे पत्रान्वये ॲड.संजय आर.चौकीदार, औरंगाबाद यांना सिव्हील अर्ज मसुदा तयार करुन देणेस विनंती केली असता त्यावर ॲड.चौकीदार यांनी दि.२४/६/२०१४ रोजी कायदेशीर मार्गदर्शनपर पत्र दिले आहे. त्यात खालीलप्रमाणे नमुद केले आहे

"In this respect I have to opinion that since the aforesaid decision does not fall in the category of major financial decision, therefore, the Committee need not approach Hon'ble High

Court for the purpose of executing the contract/agreement between Sansthan and the aforesaid Employees Co-Operative Credit Society, Hence this opinion."

प्रस्तुत प्रकरणी मा.कोर्टाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही असे ॲड.चौकीदार यांनी कळविले आहे.

तथापी यापुर्वी दाखल करण्यात आलेल्या सिव्हील अर्ज क्र.३६८६/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि२/५/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machine and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Saibaba on leave and licence upon execution of leave and licence agreement, agreement and for providing facility of Hot Water, Cold Drink and General Stores and for that purpose grant of necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decision.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास व ॲड.चौकीदार यांचे कायदेशीर मार्गदर्शनास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना स्वागत कक्ष येथील व्यवसायास दि.२२/१/२०१३ ते दि.२१/१/२०१८ पावेतो लिव्ह ॲण्ड लायसेन्स फी मध्ये प्रति वर्षी १० टक्के वाढ करुन मुदतवाढ देणेबाबतचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे दि.२८/८/२०१४ रोजीचे सभेपुढे ठेवणेत आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१२ अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मासिक परवाना फी मध्ये प्रति वर्षी १० टक्के वाढ करुन व विद्युत आकार मिटर रिडींग प्रमाणे वेगळा आकारुन मुदतवाढ देण्यात आलेली असून करारनामा करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | कालावधी | मासिक परवाना फी |
|---|---|---|
| ०१ | दि.२२/१/२०१३ ते दि. २१/१/२०१४ | ७७९/- |
| ०२ | दि.२२/१/२०१४ ते दि. २१/१/२०१५ | ८५७/- |

सदर क्लोकरुम चालविण्याची मुदत दि.२१/१/२०१५ रोजी संपलेली असल्याने प्रस्तुत प्रकरणी दि. २२/१/२०१५ ते दि.२१/१/२०१६ पर्यत मुदतवाढ देणेकामी विधी विभाग व मालमत्ता विभागाकडून सादर करण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी को.ऑप.क्रेडीट सोसायटीला जागा देणे प्रकरणी शासनाने दिलेल्या आदेशाचे काय? याबाबत विचारणा केलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.सोसायटीस चालविण्यास दिलेल्या स्टॉल बाबत मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्राने संस्थानने करावयाची कार्यवाही/ उपाययोजना याबाबत सविस्तर विवरणपत्र देवून खालीलप्रमाणे काही कार्यवाही करणेबाबत सुचीत केले आहे.

१) व्यवस्थापन समितीच्या ठरावानुसार व मंदिर परिसरात भक्तांची जास्त गर्दी होवू नये तसेच सुरक्षिततेच्या कारणास्तव मंदिर परिसरातील सोसायटीस देण्यात आलेले 6 स्टॉल बंद करण्यात यावेत व ते संस्थानने स्वत:च्या ताब्यात ठेवावे.

२) जुने प्रसादालय परिसरात व अन्य कोणत्याही परिसरात सोसायटीस स्टॉल्स द्यावयाचे झाल्यास जाहिरात/ निविदा पध्दतीचा अवलंब करुन सर्वांत जास्त रक्कमेची ऑफर स्विकारुन स्टॉल्स देण्यात यावे.

३) सोसायटीमार्फत विक्री केल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थाची अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करुन घेणे सोसायटीस बंधनकारक करण्यात यावे.

४) मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यासाठी सोसायटीकडून अतिशय नाममात्र परवाना फी घेण्यात येत असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सोसायटीकडून काढून घेण्यात यावे व त्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात याव्यात.

५) मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यास सोसायटीस दिल्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मा.जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर व मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत याबाबत सविस्तर चौकशी करण्यात यावी व त्यांच्या अहवालानुसार व शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

६) कर्मचाऱ्यांच्या सदर सोसायटीस संस्थानकडून वीज, पाणीपुरवठा या वा अन्य काही सुविधा पुरविल्या असल्यास त्यांचा भरणा सोसायटीने केलेला आहे किंवा कसे, याबाबतही कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन व संबंधीतांकडून सदर रक्कमेची वसुली करुन तसा अहवाल तात्काळ राज्य शासनास सादर करावा.

सदर प्रकरणी मुदतवाढीबाबत इतर शासकीय संस्थेच्या कर्मचारी संघटनांना कशा प्रकारे परवानगी दिली जाते याबाबत माहिती उपलब्ध करुन त्यानुसार संस्थानकडे प्रस्ताव दाखल करणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी यांना मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी समक्ष चर्चेमध्ये सांगितलेले आहे. त्यानुसार त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार मा.राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने महाराष्ट्र शासन निर्णय क्र.शाकाजा-१११३/प्र.क्र.२६/२०१३/२२ नुसार मुंबई येथील महाराष्ट्र शासनाचे मंत्रालय इमारतीचे परिसरात दि.महाराष्ट्र मंत्रालय

ॲण्ड अलाईड ऑफिसेस को.ऑप.बॅंक लि तसेच दि.महाराष्ट्र मंत्रालय व संलग्न कर्मचारी को.ऑप.क्रेडिट सोसा.लि.यांची कार्यालये शासनाचे प्रचलित दरानुसार जागा भाडे करारानुसार चालु आहेत

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सो. लि.,शिर्डी स्वागतकक्षाजवळील चालवित असलेल्या क्लोकरुम बाबत खालील मुद्दयावर निर्णय होणेसाठी सादर.

**अ)** सदर क्लोकरुम दि. २२/१/२०१५ ते दि.२१/१/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी वापरास देणेकामी शासनाचे मंजुरीस प्रस्ताव सादर करुन मुदतवाढ देणेबाबत मान्यता घेणे. **किंवा**

**ब)** दि.२८/१०/२०१३ चे शासनाचे पत्रास अनुसरुन स्वागतकक्ष जवळील क्लोकरुम वापरास देणेकामी निविदा प्रक्रिया राबवुन सदर प्रक्रिया पुर्ण होईपावेतो मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन मागील अटी शर्तीवर चालविण्यास देणेबाबत निर्णय होणे. **किंवा**

**क)** निविदा प्रक्रिया न करता शासनाची मान्यता प्राप्त होईपावेतो सदर स्वागतकक्षाजवळील क्लोकरुम बंद ठेवणे.

सदर क्लोकरुम वापराची मुदत संपुष्टात येऊन बराच कालावधी झालेला असल्याने व क्लोकरुम पुर्ववत सुरु असल्याने मुदतवाढीबाबत पुढील निर्णय तातडीने होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.**

**तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि., शिर्डी हे स्वागतकक्ष येथे चालवत असलेल्या क्लोकरुमला त्यांची मुदत संपलेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा शासनआदेश येईपर्यत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यत लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विद्युत बील मिटर रिंडीग प्रमाणे वेगळे आकारण्यात येऊन मागील अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं०.५** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात आलेल्या पाणी व्यवस्था व वाढीव साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ मध्ये दि. ०१ जुलै, २०१५ ते दि. ३० सप्टेंबर, २०१५ या कालावधीत शिर्डीमध्ये श्री साईबाबांचे समाधीचे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने शिर्डीस येणा-या साईभक्तांसाठी पिण्याचे पाण्याची तसेच संडास बाथरुमसाठी व प्रस्तावित वाहनतळाचे ठिकाणी पाण्याची सोय उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु. १७,९७,९६०/- मात्र खर्चास व भाडोत्री टॅंकर लावणेकरीता अंदाजे रु ७,४०,८८०/- मात्र असे एकुण अंदाजे रु २५,३८,८४०/- खर्चास पाणीपुरवठा विभाग दि. १७.०१.२०१५ चे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरातील साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी सर्व कामे विहीत कार्यपध्दतीने करुन देणेस व याकामी येणारे अंदाजे रु. ५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे सभेत व मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद दि. ०६.०५.२०१५ रोजीचे आदेशान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी याव्यतिरिक्त वाढीव पाण्याच्या टाक्या ठेवणेबाबत निर्देश दिलेवरुन पाणी पुरवठा विभागाकडुन पाणी व्यवस्थेसाठी वाढीव पाण्याच्या टाक्या व टाक्या ठेवणेसाठी आवश्यक स्टॅंड तयार करणेसाठीचे साहित्य खरेदी करणेसाठी दि. ०८/०८/२०१५ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु बांधकाम विभागाकडुन देण्यात आलेल्या टेंडरमध्ये वाहनतळाचे ठिकाणी १० टॉयलेटकरीता २००० लि. क्षमतेची अतिरिक्त पाणी व्यवस्था संबंधीत टेंडरधारकाकडुन करण्यात येणार असल्याने सद्यस्थितीत विभागाकडील उपलब्ध पाणी टाक्या ठेवून पाणी साठविण्याची व्यवस्था करणेकरीता टाक्या ठेवणेसाठी आवश्यक असलेले स्टॅंड तयार करणेसाठी लागणारे एम.एस.ॲंगल५०X५०X५ mm व एम.एस.पट्टी २५X५ mm हे मटेरियल अपुरे पडल्याने ते खरेदी करणे आवश्यक आहे.

खरेदी विभागाकडुन यापुर्वी करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्नतर दराचे ठेकेदार मे. युनियन ट्रेडिंग, नाशिक यांचेकडुन टाक्या ठेवणेसाठी आवश्यक असलेले स्टॅंड तयार करणेसाठी लागणारे एम.एस.ॲंगल५०X५०X५ mm व एम.एस.पट्टी २५X५ mm हे साहित्य जा.नं./एसएसएस/खरेदी-पा.पु./२१९६/२०१५, दि. २१/०७/२०१५ चे आदेशान्वये रु. ४७.९५/- मात्र प्रती किलो या दराने खरेदी करण्यात आलेले आहे.

खरेदी करावयाच्या वाढीव साहित्याचा व त्यासाठी येणा-या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **साहित्याचा तपशिल** | **मागणी** | **खरेदी दर प्रती किलो.** | **एकुण रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस.ॲंगल- ५०X५०X५ mm, हेवी. | ३००० किलो. | रु. ४७.९५/- प्रती किलो. | १,४३,८५०.०० |
| ०२ | एम.एस.पट्टी-२५X५ mm | ९०० किलो. | रु. ४७.९५/- प्रती किलो. | ४३,१५५.०० |
| | | | **एकुण रुपये-** | **१,८७,००५.००** |

दि. १७/०१/२०१५ रोजीचे टिपणीन्वये नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता शिर्डीस येणा-या साईभक्तांसाठी पिण्याचे पाण्याची तसेच संडास बाथरुमसाठी व प्रस्तावित वाहनतळाचे ठिकाणी पाण्याची सोय उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु. १७,९७,९६०/- मात्र खर्चास यापुर्वी मान्यता देण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रियेनंतर खरेदी विभागामार्फत यापुर्वी खरेदी करण्यात आलेल्या साहित्यासाठी रु.

१५,०५,६९२/- मात्र खर्च आलेला आहे. वरील नमुद वाढीव साहित्य खरेदी करणेसाठी रु.१,८७,००५/- मात्र खर्च येईल. सदरचा खर्च शिल्लक अंदाजपत्रकिय रक्कम रु. २,९२,२६८/- मात्र मधुन करता येईल.

दि. १०/०८/२०१५ रोजीचे टिपणीन्वये सदरचे साहित्य खरेदी करणेकरीता मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु खरेदी विभागाकडुन सदरचे साहित्य खरेदी करणेकरीता संबंधीत पुरवठाधारकास पुरवठा आदेश देणेसाठी मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणेबाबत सुचविण्यात आलेले आहे.

तरी पाणी पुरवठा विभागाकरीता सध्या उपलब्ध असलेल्या टाक्या ठेवणेसाठी स्टॅंड तयार करणेसाठी वरीलप्रमाणे साहित्याची आवश्यकता आहे. तरी सदरचे साहित्य निविदा प्रक्रियेतील निम्नतर दराचे ठेकेदार मे. युनियन ट्रेडिंग, नाशिक यांचेकडुन खरेदी करणेस व त्यासाठी येणारे एकुण रु. १,८७,००५/- मात्रचे शिल्लक रकमेतुन वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस व खरेदी विभागाकडुन पुरवठा आदेश होणेस मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.२७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कुंभमेळयाचे कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी पिण्याचे पाण्याच्या टाक्या ठेवणेसाठी स्टॅंड तयार करुन घेणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले साहित्य, निविदा प्रक्रियेतील निम्नतर दराचे ठेकेदार मे.युनियन ट्रेडिंग, नाशिक यांचेकडुन खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या एकुण रु.१,८७,००५/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं०.६** **दि.१६.०८.२०१५ ते दि.१५.०८.२०१६ अखेर या कालावधीचे साईनिवास अतिथीगृह येथील टाटा स्काय कनेक्शन फी भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१७/०५/२००९ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं. २५ व निर्णय क्र.४८८ अन्वये मान्यता मिळाल्याने संस्थानच्या अतिथीगृहातील २५ रुममध्ये टाटा स्कायचे कनेक्शन घेण्यात आलेले आहे. मागील वर्षी टाटा स्काय रिचार्जकरीता भरलेल्या फीची मुदत दि१५/०८/२०१५ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे, पुढील दि.१६/०८/२०१५ ते दि.१५/०८/२०१६ या वर्षाकरीता सु प्रिम स्पोर्टस कीडस मिक्स पॅक रिचार्ज करण्यासाठी खालीलप्रमाणे दर आहेत.

साईनिवास अतिथीगृहातील २५ कनेक्शनचे प्रत्येकी ०४ कनेक्शनप्रमाणे ०६ ग्रुप व सिंगल कनेक्शनचा १ ग्रुप आहे.

| | |
|---|---|
| ग्रुपच्या ०४ पैकी पहील्या कनेक्शनसाठी दरमहा रुपये- | ३४० X १ = ३४०/- |
| व उर्वरीत ०३ कनेक्शनसाठी दरमहा रुपये- | २०० X ३ = ६००/- |
| एका ग्रुपसाठी दरमहा फी- | **एकुण रुपये- = ९४०/-** |
| ०४ कनेक्शनच्या एका ग्रुपची दरमहा फी रुपये- | ९४० X ६ = ५६४०/- |
| ०१ सिंगल कनेक्शनच्या ग्रुपची दरमहा फी रुपये- | ३४० X १ = ३४०/- |
| दरमहा एकुण २५ कनेक्शनची फी- | **एकुण रुपये- = ५९८०/-** |

दरमहा एकुण २५ कनेक्शनची फी रुपये- ५९८० X ११ महिने = ६५,७८०/- रुपये आहे. ११ महिन्यांचे फी भरल्यानंतर १ महिना मोफत मिळतो. २५ कनेक्शनची वार्षिक फी रुपये- ६५,७८०/- मात्र भरावी लागणार आहे.

वरीलप्रमाणे सन २०१५ ते २०१६ या वर्षासाठी रिचार्ज फी भरणेकामी रुपये- ६५,७८०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी दि.१६/०८/२०१५ ते दि.१५/०८/२०१६ अखेर टाटा स्काय रिचार्जकरीता येणा-या रुपये- ६५,७८०/- (अक्षरी- पासष्ठ हजार सातशे ऐंशी रुपये मात्र) खर्चास व टाटा स्कायचे अधिकृत डीस्ट्रीब्युटर श्री.रुपचंद भागचंद कासलीवाल, श्रीरामपुर यांना कोटेशनप्रमाणे रिचार्ज करण्याकरीता पुरवठा आदेश देणेस विनंती व सदरचा विषय मा.उप समितीचे सभेपुढेसादर करणेस मान्यता असावी. तसेच पुढील प्रत्येक वर्षी टाटा स्कायच्या प्रचलित दराप्रमाणे रिचार्ज फी भरण्याकरीता मान्यता मिळावी.वरील रिचार्जेसचे दर टाटा स्काय कंपनीचे आज रोजीचे दराप्रमाणे असुन, कंपनीचे रिचार्ज करतेवेळी दर बदलल्यास वाढीव रक्कमेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१६.०८.२०१५ ते दि.१५.०८.२०१६ अखेर या कालावधीचे साईनिवास अतिथीगृह येथील टाटा स्काय कनेक्शन फी भरणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या रु.६५,७८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कन्ट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं०.७** **वाहनतळांचे ठिकाणी वीज जोडणी करुन घेणेकरीता विद्युत चार्जेस भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

कुंभमेळा कालावधीत भक्तांची वाहने पार्कीग करणेकरीता उभारण्यात येणाऱ्या विविध ठिकाणचे पार्कीग एरियामध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून विद्युतपुरवठा जोडुन घ्यावयाचा असल्याने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने कळविलेल्या विद्युत चार्जेसची रक्कम भरावी लागणार आहे.

याकामी दिनांक ३०-०१-२०१५ रोजी झालेल्या मा.त्रीसदस्य समितीचे सभेमधील विषय क्र.०६ निर्णय क्र.०६ नुसार वीज जोडणीच्या सिक्युरिटी चार्जेसची रक्कम रुपये ७५,०००/- मात्र भरणेस मान्यता मिळालेली आहे. विद्युत चार्जेस भरावयाच्या रकमेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | ग्राहक क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सावळीविहीर बु॥ सावळीविहीर फाटा | १६४५४०००३७९६ | रु. २०,१००.०० |
| २) | (सावळीविहीर) सोमय्या शाळेच्या पाठीमागे लक्ष्मीवाडी | १६४७२००१५७५० | रु. २०,१००.०० |
| ३) | निमगांव-को-हाळे, नगर-मनमाड रोडचे पूर्व बाजूस | १६४६६००५६९१५ | रु. १५,१००.०० |
| ४) | साकुरी, नगर-मनमाड रोड (साई उपासनी फॅब्रिकेशन शेजारी हॉटेल प्रभात समोर, गोदावरी वसाहत) | १६४७१०११६५७४ | रु. १५,१००.०० |
| ५) | साकुरी, मा.ना.राधाकृष्ण विखे पा.पेट्रोलपंपाजवळ | १६४७१०११६५८२ | रु. १५,१००.०० |
| ६) | शिर्डी, बिरेगाव रोड, कालीका | १६४५५८०७६२१९ | रु. २०,१००.०० |
| ७) | रुई, पिंपळवाडी रोड | १६४५५८०७६२२७ | रु. १५,१००.०० |
| ८) | नांदुर्खी बु, नांदुर्खी रोड | १६४५५८०७६२३५ | रु. १६,०००.०० |
| | | **एकुण रक्कम रुपये :-** | **रु.१,३६,७००.००** |

०१). उपरोक्त आठ वाहनतळांचे ठिकाणी विद्युतपुरवठा जोडून घेणेकरीता एकुण रुपये१,३६,७००/- इतकी विद्युत चार्जेसची रक्कम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भरावी लागणार आहे.

०२). प्रत्येक ग्राहक क्रमांकाचे नावे स्वतंत्र रकमेचा भरणा करावा लागणार आहे

०३). विद्युत चार्जेस भरणेकरीता मान्यता मिळालेल्या रक्कमपेक्षा रु.६१,७००/- इतकी रक्कम जादा भरावी लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे विद्युत चार्जेसची रक्कम **रुपये १,३६,७००/-** मात्र भरणेस व जादा रकमेस (**रुपये ६१,७००/-**) मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळयाचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी बनविण्यात आलेल्या वाहनतळाचे ठिकाणी वीज जोडणी करुन घेणेकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे रु.१,३६,७००/- मात्र विद्युत चार्जेसची रक्कम भरणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं०.८** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांचे पार्कींगकरीता मौजे शिर्डी येथील गट १०५/१/२/२ पैकी मधील क्षेत्रामध्ये वाहनतळाची व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे

***“***.. .. *उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले.* ***”***

मा.उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश:- Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011 वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:-** दि.२७ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्यशाही स्नानाच्या तिथी असल्याने शिर्डी येथे जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्याअतिरिक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्यावाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या

स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इत्यादी सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये इकडील विभागामार्फत शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांकरीता तात्पुरते वाहनतळे विकसीत करणेकामी ई-निविद प्रकीया पूर्ण करून निम्नतम दरधारक मे. एस.के. येवले ॲण्ड कं. संगमनेर यांना पूर्वीचे सात ठिकाणी वाहनतळ विकीसीत करणे कामी इकडील जा.क्र.१८९८/२०१५ दि.०४/०७/२०१५ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३५००/२०१५ मधील पी.आय.एल. नं.१८/२०११ वर मा. उच्च नयायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रू.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे. उपरोक्त मंजुर खर्चा मध्ये ०७ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेकामाचा समावेश करण्यात आलेला होता. तदनंतर दि. २४/०६/२०१५ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेत वाढीव ०४ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र. १७२ संमत करणेत आलेला आहे.

*" नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन -२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांसाठी ०४ वाढीव वाहनतळे विकसीत करणे व वाहनतळांच्या जागांकरीता भाडेपट्टा अदा करणेसाठी येणा-या अंदाजे रु.२,३९,२५,७२६/- मात्रचे खर्चास, तसेच सदरहु कामे यापुर्वी ०७ वाहनतळांरीता करण्यात येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेव्दारे ठरविण्यात येणा-या ठेकेदांराकडून मंजूर दराने करुन घेणेस चक्रीय पध्दतीने समिती अध्यक्ष व सदस्यांची मान्यता घेण्यात येऊन, त्यावर कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे.*

दिनांक २३/०७/२०१५ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य व मा. पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी दिलेल्या भेटीमध्ये साईप्रसाद प्रॉपर्टीज लि., येथून अंतर्गत वाहतूकीसाठी येणाऱ्या बस / प्रीप्रेड रिक्षांकरीता शिर्डी येथील साई आश्रम भक्तनिवासचे दक्षिण बाजू जवळील क्षेत्रामध्ये तात्पुरते स्वरुपात थांबा तयार करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. त्यास अनुसरुन मौजे शिर्डी येथील श्री. यादव बाबुराव कोते यांनी त्यांचे गट क्र. १०५/१/२/२ पैकी मधील क्षेत्र विनामोबदला देणेबाबत सहमती दर्शविली असून, सदरचे क्षेत्र अधिग्रहीत करणेबाबत मा. तहसिलदार, राहाता यांना दि.१४/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. सदरची कार्यवाही त्यांचेमार्फत सुरु आहे.

करीता सदरचे क्षेत्रामध्ये कुंभमेळा सन २०१५ निमीत्त दि. २७/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालाधीकरीता अंतर्गत वाहतूकीसाठी येणाऱ्या बस/ प्रीप्रेड रिक्षा थांबा यासाठी सदरचे क्षेत्रामध्ये मुरुम टाकुण लेव्हल करणे, निवारा शेड उभारणे, पुरुष व स्त्रीयांसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह इत्यादी व्यवस्था करणेसाठी रक्कम रु.४,२५,००००/- खर्च अपेक्षीत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु४,२५,०००/- मात्रचे खर्चास व सदरहू कामे ही मंजूर दराचे ठेकेदार यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८०** **प्रस्तावीत क्षेत्राची समिती अध्यक्ष व सदस्यांनी समक्ष पाहणी करुन असे ठरविले की, कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये येणा-या भाविकांच्या सोयीसाठी या जागेचे सपाटीकरण करणेत येऊन तेथे एक फिरते शौचालय व पिण्याच्या पाण्याच्या दोन टाक्या ठेवणेत याव्यात.**

**तसेच यासाठी प्रत्यक्षात येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं०.९** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात नियोजीत वाहनतळांवर साईभक्तांचे सोयीसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरिनल्स भाडेतत्वावर घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-**मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे

*"... उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी तसेच*

*शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले."*

**मा.उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश:-** Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011 वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:-**दि.२७ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने शिर्डी येथे जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत अतिरिक्त सुविधांमध्ये साई भक्तांच्यावाहनांसाठी वाहनतळे तयार करणे,तात्पुरत्या स्वरुपाची निवासव्यवस्था, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इ. सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ निर्णयान्वये इकडील विभागामार्फत १६० पोर्टेबल टॉयलेटस व १६० युरिनल्स भाडेतत्वावर घेणेकामी दि.१५/०५/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या.

२) सदर वेळी ०३ ठेकेदारांनी ई-निविदा सादर केल्या. प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक लिफाफ्यातील कागदपत्रांची छाननी केली असता फक्त ०२ ठेकेदार पात्र झालेले होते.

३) तदनंतर दि.१८/०६/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये याकामी दुसऱ्यांदा वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर निविदा मागविणेसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली,सदर वेळी ०४ ठेकेदार यांनी ई-निविदा अपलोड केल्या. या प्रकियेत पात्र होणा-या ०३ ठेकेदारांच्या वाणिज्यीक निविदा दि.०८/०७/२०१५ रोजी उघडणेत आल्या असता त्यावेळी YLDA India Pvt.Ltd., Pune यांचे दर रु.६१,४४,०००/- मात्र निम्नतम आले होते.

तथापी व्दितीय निम्नतम दरधारक SaraplastPvt.Ltd., Pune यांनी दि.०९/०७/२०१५ रोजीचे पत्राव्दारे सदरहु निविदा प्रकियेबाबत मा. अध्यक्ष सो. यांचेकडे हरकत दाखल केली असल्याने सदरहु हरकतीबाबत निर्णय होणेसाठी दि.२७/०७/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीपुढे प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलपैकी व्दितीय व तृतीय निम्नतम दरधारक यांचेशी मा.कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष चर्चा करुन त्यांचेपैकी जे ठेकेदार वर नमुद निम्नतम दरधारक यांचे दरात काम करणेस तयार असतील त्यांचेकडुन काम करून घ्यावे असे ठरले.

त्यानुसार दि.२८/०७/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेवुन निविदाधारक SaraplastPvt. Ltd., Pune व Windoors International Ltd., Mumbai यांना दि.२८/०७/२०१५ रोजीचे पत्राव्दारे व ई-मेलव्दारे सुचीत करणेत येवून दि.२९/०७/२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे समोर चर्चेकरीता बोलविण्यात आले. त्यानुसार सदर दिवशी ठेकेदार यांचे खालिल प्रतिनिधी उपस्थित होते.

१. श्री. शैलेश क्षिरसागर, साराप्लास्ट प्रा. लि., पुणे.

२. श्री. राहुल गुजराथी, विंडोर्स इंटरनॅशनल लि, मुंबई.

यावेळी मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदर निविदाधारकांना निम्नतम दरधारक यांची निविदा रक्कम रु.६१,४४,०००/- मात्र इतकी असल्याचे सांगून सदर रकमेत काम करण्याची तयारी आहे काय, याविषयी विचारणा केली. त्यावर वरील दोन्ही प्रतिनिधींनी निम्नतम दरात काम करणेस असमर्थता दर्शविली. त्यावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी त्यांनी देऊ केलेल्या ई-निविदा दरात काही सवलत देण्याची तयारी असल्यास तसा सुधारीत दर प्रस्ताव देणेची विनंती केली.

त्यानुसार मे. साराप्लास्ट प्रा. लि. पुणे (व्दितीय निम्नतम दरधारक) यांनी सादर केलेल्या सुधारीत दर प्रस्तावात काही अटींचा समावेश केला असल्याने वरील विषयांकित कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदा रद्द करुन याकामी अल्प मुदतीच्या निविदा सूचनेव्दारे फेर ई-निविदा मागविणेचे प्रस्तावास दि.०१/०८/२०१५ रोजी मा.त्रिसदस्य समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेली आहे.

४) त्यानुसार याकामी दि.०१/०८/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये १८८ पोर्टेबल टॉयलेटस व १६० युरिनल्स भाडेतत्वावर घेणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर नव्याने तिस-यांदा ई-निविदा मागविणेसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदरहू कामाची ई-निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करणेत आलेली होती. करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Activity | Date & Time |
|---|---|---|
| 1) | Tender publishing date: | 05/05/2015. |
| 2) | Tender document download start date: | 05/08/2015 from 11:00 Hrs. |
| 3) | Tender document download end date: | 11/08/2015 upto 17:00 Hrs. |
| 4) | Bid submission start date: | 05/08/2015 from 12:00 Hrs. |
| 5) | Bid submission closing date: | 11/08/2015 upto 17:00 Hrs. |
| 6) | Technical bid hard copy submission date: | 12/08/2015 upto 17:00 Hrs. |
| 7) | Bid opening date (Technical): | 13/08/2015 at 11:00 Hrs. |

| 8) | Bid opening date (Commercial): | 13/08/2015 at 15:00 Hrs. |
|---|---|---|

उपरोक्तकामीविहित मुदतीत खालील ०२ निविदाधारक यांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

| 01) | YLDA India Pvt. Ltd., Pune. | 02) | M/s. Bhutani International Pvt. Ltd., New Delhi. |
|---|---|---|---|

वरीलप्रमाणे अपलोड झालेल्या ई-निविदांचा लिफाफा क्र.०१ (Technical Bid)दि.१३/०८/२०१५ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. प्रशासकिय अधिकारी व लेखाधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन अपलोड केलेल्या निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी करणेत येऊन त्याचे मुल्यमापनाबाबतचा अहवाल तक्त्याच्या स्वरुपात सादर करण्यात आलेला होता. सदर अहवालावर मा. मुख्य लेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

*"मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा झाल्याप्रमाणे कार्यवाही करावी. YLDA हे पात्र ठरू शकत नाहीत परंतू भूतानी यांचेकडून कागदपत्रे मागवून घ्यावीत, तसेच भुतानी यांचाDD ग्राह्य धरणेत यावा."*

सदरहु निविदा तिस-या वेळी मागविण्यात आलेली असल्याने व काम पूर्ण करणेसाठी अत्यल्प कालावधी आहे करीता मे. भुतानी इंटरनॅशनल यांचे प्रतिनिधी श्री दिपेश भुतानी यांचेशी दूरध्वनीवर चर्चा करुन कागदपत्रे मागणी केली असता, त्यांनी ई-मेलव्दारे काही कागदपत्रे पाठविली आहेत. त्यापैकी प्रामुख्याने नाशिक महानगरपालिका यांनी २००० टॉयलेट व ३०० मुताऱ्या भाडेतत्वावर उभारणेसाठी रु.४,०८,९१,०००/- मात्र रक्कमेच्या कार्यादेशाची प्रत त्यांनी सादर केली आहे.

त्यानुसार M/s.Bhutani International Pvt. Ltd.; New Delhi हे नाशिक येथे काम करत असलेबाबत दिलेल्या कार्यादेशाबाबतची खात्री करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मा. आयुक्त नाशिक महानगरपालिका यांचेबरोबर दूरध्वनीव्दारे चर्चा करुन सदर काम करत असलेबाबत खात्री करणेत आली.

तथापी मे. भूतानी यांनी त्यांचे तांत्रीक ई-निविदेतून खालील कामाच्या पूर्णत्वाचा दाखला यापुर्वीच सादर केलेला आहे.सदर दाखल्यात कामाची किमंत रु.३० लक्ष पेक्षा कमी असल्याने त्याचा मुल्यमापनासाठी समावेश केलेला नव्हता.

| अ. न. | किमान पात्रता निकष | सादर केलेली कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | निविदाधारक यांनी मागील ०५ वर्षात खालीलप्रमाणे कामे केलेली असणे आवश्यक आहे.<br>याप्रकारचे रु. ६० लक्ष किमतीचे एक काम<br>**अथवा**<br>याप्रकारचे रु. ३० लक्ष किमतीचे दोन कामे | **Reliance Broadcast Network Ltd.,**Work Order for Mobile Toilet Service -Portable Toilets on Rent for DETDC Project.<br>Date of Completion – 30/08/15.<br>**Value of Work – Rs.41,69,340/-.**<br>**GSIDC** - Installation and Maintenance of Chemical Portable Toilets for Exposition St. Francis Xavier 2014-2015 at Old Goa.<br>Date of Completion – 04/01/2015.<br>**Value of work – Rs.29,60,770/-.** | सदर किमान पात्रता निकषानुसार ठेकेदार यांनी रु. ३० लक्ष किमंतीचे दोन कामे करणे आवश्यक आहे. तथापी<br>१) Reliance Broadcast Network Ltd.,यांचे रू.४१.६९ लक्ष इतक्यारकमेचे एक काम.<br>२) GSIDC,Goa,यांचे रू.२९.६०७ लक्ष इतक्या रकमेचे दुसरे काम केलेले आहे तथापी किमान पात्रता निकषानुसारGSIDC, Goa, यांचेकडील काम पूर्णत्वाच्या दाखल्यानुसार फक्त रु. ३९,२३०/- इतकी रक्कम कमी पडत आहे. |

किमान पत्राता अटींनुसार निविदाधारक यांनी रु६० लक्ष रक्कमेचे ०१ काम अथवा रु.३० लक्ष रक्कमेची ०२ कामे मागील ०५ वर्षात करणे आवश्यक असल्याने सदर ठेकेदार यांनी वर नमूद केलेप्रमाणे रु४१.६९ लक्ष व रु.२९.६०७ लक्ष अशी ०२ कामे केलेली असून त्यांची एकूण किमंत रु७१.३० लक्ष इतकी होते. त्यामुळे यासंबंधीतीची पूर्वपात्रता अट शिथील करुन M/s.Bhutani International Pvt.Ltd.New Delhi यांना पात्र ठरविणेबाबत विचार होणेस हरकत नाही.

याबाबत दिनांक १५/०८/२०१५ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेशी शिर्डी येथिल सिंहस्थ कुंभमेळा आढावा बैठकीत मा. कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा केली. यावेळी सदर चर्चेत M/s.Bhutani International Pvt.Ltd.New Delhi हे नाशिक येथिल सिंहस्थ कुंभमेळ्याचे नाशिक महानगरपालीका यांचे कार्यादेशान्वये पोर्टेबल टॉयलेटचे रु.४.०८९ कोटी रक्कमेचे काम करीत आहेत. त्यामुळे शिर्डी येथील कामाचा विचार करता त्यांना पहिल्या टप्प्याचे काम देणेस हरकत नाही असे वाटते. तसेच आता शिर्डी येथे सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता करावयाचे व्यवस्थेसाठी अत्यंत अल्प कालावधी शिल्लक राहीलेला असल्याने सदर काम तातडीने होणे आवश्यक आहे. कुंभमेळा कालावधीत मोठ्या प्रमाणात साईभक्तांची गर्दीहोण्याची शक्यता असल्याने सदर पोर्टेबल टॉयलेटचे काम वेळेत पूर्ण झाले नाही तर साईभक्तांची गैरसोयहोईल व सदर काळात परिसर अस्वच्छ झाल्यास रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने मा अध्यक्ष व मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेशी झालेल्या

चर्चेनुसार "M/s.Bhutani International Pvt.Ltd.New Delhiयांची वाणिज्यीक निविदा (Financial Bid) उघडून त्यावर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

त्यानुसार वरीलप्रमाणे प्राप्त दोन ई- निविदांपैकी फक्त M/s.Bhutani International Pvt.Ltd.,New Delhi यांची वाणिज्यीक निवीदा मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने दि.१७/०८/२०१५ रोजी दुपारी २:२४ वाजता उघडण्यात आली. या ई-निविदेमधिल वित्तीय देकाराचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

**Estimated Value : Rs.82,72,000/-. (Total – 188 Toilets and 160 Urinals).**

| Sr. No. | Name of Contractor | Quoted Amount (Rs.) |
|---|---|---|
| 01) | M/s. Bhutani International Pvt. Ltd., New Delhi. | 73,60,000/- |

तथापी मा. अध्यक्ष व मा. जिल्हाधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार गर्दीचे नियोजन बघून टप्प्याने टप्प्याने सदर काम हाती घेता येईल. पहिल्या टप्प्यात एकूण ८० युरिनल्स व ९० पोर्टेबल टॉयलेटचे काम हाती घेता येईल. याकरीता ठेकेदार यांनी दिलेल्या दरानुसार रु.३६,२०,०००/- मात्र इतकी रक्कम होत आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Description | Days | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Toilets:** | | | | | |
| 1.01 | Providing, Installing and Maintenance of Portable Toilets with septic / collection tank - **Operative Days.** | 20.00 | 90.00 | Nos. | 1200.00 | 21,60,000.00 |
| 1.02 | Providing, Installing and Maintenance of Portable Toilets with septic / collection tank - **Non-Operative Days.** | 10.00 | 90.00 | Nos. | 600.00 | 5,40,000.00 |
| 2 | **Urinals:** | | | | | |
| 2.01 | Providing, Installing and Maintenance of Portable Urinals with septic / collection tank - **Operative Days.** | 20.00 | 80.00 | Nos. | 450.00 | 7,20,000.00 |
| 2.02 | Providing, Installing and Maintenance of Portable Urinals with septic / collection tank - **Non-Operative Days.** | 10.00 | 80.00 | Nos. | 250.00 | 2,00,000.00 |
| | **Total Amount:** | | | | | **36,20,000.00** |

तसेच तदनंतर गर्दीचे नियोजनानुसार ठेकेदार यांना उवरीत कामासाठीचा कार्यादेश दुसऱ्या टप्प्यात देता येईल, असे मत आहे.

**प्रस्ताव:-** संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात नियोजीत वाहनतळांवर साईभक्तांचे सोयीसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरीनल्स भाडेतत्त्वावर घेणेबाबत ०३ वेळा निविदा मागविण्यात आल्या असून सदरहू निविदा प्रक्रीयेस अल्पप्रतिसाद मिळालेला आहे. तसेच या क्षेत्रात काम करणारे ठेकेदार हे फार कमी आहेत. सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता शिर्डी येथे साईभक्तांचे करावयाचे व्यवस्थेसाठी अत्यंत अल्प कालावधी शिल्लक राहीलेला असल्याने कुंभमेळा कालावधीत साईभक्तांची गैरसोय टाळणेसाठी व सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये या बाबींचा साकल्याने विचार करुन झालेल्या सविस्तर चर्चेनुसार पहिल्या टप्प्यात एकूण ८० युरिनल्स व ९० पोर्टेबल टॉयलेटचे काम हाती घेऊन ठेकेदार यांना रु.३६,२०,०००/- मात्र इतक्या रकमेचा कार्यादेश देता येईल तसेच गर्दीचे नियोजन बघता व गरज भासल्यास उर्वरीत काम दुसऱ्या टप्प्यात करणेसाठी स्वतंत्र कार्यादेश देता येईल, असे मत आहे.

तरी M/s.Bhutani International Pvt.Ltd. New Delhi यांची एकूण रु७३,६०,०००/- मात्र इतक्या रकमेची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना पहिल्या टप्प्यात वरीलप्रमाणे रु.३६,२०,०००/- मात्र इतक्या रकमेचा कार्यादेश देणेस व गर्दीचे प्रमाण बघून गरज भासल्यास दुसऱ्या टप्प्यात उर्वरित कामाचा कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात नियोजीत वाहनतळांवर साईभक्तांचे सोयीसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरिनल्स भाडेतत्वावर घेणेबाबतच्या प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास तातडीची गरज म्हणून समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेऊन कार्यवाही चालू करणेत आली आहे. सबब या प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१० **श्री.किशोर केशव क्षीरसागर, लिपीक-टंकलेखक यांचे बदलीबाबत.**

प्रस्ताव- श्री.किशोर केशव क्षिरसागर, लिपीक-टंकलेखक, मुंबई कार्यालय यांनी दिनांक०१ एप्रिल, २०१५ रोजीच्या अर्जान्वये, मी संस्थानच्या मुंबई कार्यालय येथे लिपीक-टंकलेखक म्हणून कार्यरत आहे. संस्थान प्रकाशित साईलीला (मराठी) व श्रीसाईलीला (हिंदी- इंग्रजी) या द्वैमासिकांच्या नवीन सभासदांची संगणकावर नोंद करणे, जुन्या सभासदांचे नुतनीकरण करणे, दुरध्वनी, ई-मेल, टपाल याद्वारे व प्रत्यक्ष संपर्क साधून सदर द्वैमासिकासंबधी विचारणा करणाऱ्या सभासदांना

समर्पक माहिती देणे, त्यांच्या समस्यांचे निवारण करणे, अंक सभासदांना टपालाने पाठविण्याकामी त्यांच्या नोंदींची स्टिकर्स काढणे, टपालासाठी फ्रॅंकिंग करणे आदि नेमून दिलेल्यामुख्य कामांबरोबरचमी मुंबई कार्यालयातीलभक्तांसाठी दर्शन व निवासाकरिता ऑनलाईन बुकींग करणे, पुस्तक-फोटो विक्रीच्या, देणग्यांच्या पावत्या बनविणे, वैद्यकिय आर्थिक मदतीसाठी येणा-या रुग्णांना, त्यांच्या नोतवाईकांना माहिती देणे इत्यादी कामेही करीत असतो.

सदर नियतकालिकांच्या प्रकाशनाकरीता करण्यात येत असलेल्या लेखन- संदर्भशोधन – संपादन- संगणकीय अक्षरजुळणी- मुद्रितशोधन – पृष्ठरचना – आवरणसजावट आदि कामांमध्ये माझा सहभाग बिल्कुल नसतो. मात्र, या कामांत माझा सहभाग असल्याचे समजून, सामान्य प्रशासन विभाग, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडील जा.नं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/६०२३/२०१५, दिनांक २९ मार्च, २०१५ या आदेशान्वये माझी बदली करण्यात आलेली आहे. सध्या मुंबई कार्यालयात कार्यरत असलेल्या एकूण ०६ कायम कर्मचा-यांपैकी०३ कर्मचारी येत्या ०३ ते ०६ महिन्यात सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे तेथील कामे नीट पार पाडण्यासाठी येथे कर्मचा-यांची नितांत आवश्यकता आहे. याचबरोबर माझे वडील श्री.केशव पंढरीनाथ क्षिरसागर (वय वर्षे ८४) हे अस्थम्याच्या आजाराने त्रस्त आहेत, तर आई सौ. रजनी केशव क्षिरसागर (वय वर्षे ७४) ही कॅन्सरपीडीत आहे. डॉक्टरांनी तिच्यावर नियमित उपचार करुन घेण्यास सांगितलेले आहे. या दोघांचीही सर्वस्वी जबाबदारी माझ्यावर आहे. तरी कृपया उपरोक्त उल्लेखित बाबींचा सहानुभूतीपूर्वक सर्वकष दृष्टीने विचार करुन मला मुंबई कार्यालयतील कामांसाठी येथेच कार्यरत असू द्यावे. अशी विनंती केलेली आहे.

सदरच्या अर्जासोबत श्री.किशोर क्षिरसागर यांनी डॉ. निर्मल राऊत यांचे सौ रजनी क्षिरसागर यांच्या आजाराबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या अर्जावर प्र.अधिक्षक, मुंबई कार्यालय यांनी, उपरोक्त उल्लेखित माहिती वस्तुस्थितीदर्शक असून, सदर निवेदनाचा कृपया सहानुभूतीपूर्वक व मुंबई कार्यालयातील कामकाज सुरळीतपार पाडण्याच्या दृष्टीने विचार व्हावा. असा अभिप्राय दिलेला आहे.

श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना तात्काळ सेवा-सुविधा पुरविणेकामी मनुष्यबळ कार्यक्षमता पडताळणी करणेकामी दि.२३/१०/२०१४ व दि.०६/१२/२०१४ रोजीचे परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळवून तपशिलवार माहिती मागविण्यात आलेली होती. त्याकामी मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात दि.०८/११/२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी मुंबई कार्यालयाकडील सर्व कर्मचा-यांना पुर्णवेळ वर्कलोड नसलेबाबत तसेच प्रकाशने विभागाकडील दि.०५/११/२०१४ रोजीचे पत्रान्वये साईलीला मासिकाच कामकाजावर कोणाचेही नियंत्रण नसल्याने मुंबई कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांपैकी ०२ लिपीक वर्गीय कर्मचारी,०१ शिपाई व ०१ स्वच्छता कर्मचारी ठेऊन उर्वरीत सर्व कर्मचारी साईलीलाचे कामासह शिर्डी येथे वर्ग करणेबाबत आदेश दिलेले होते.

मुंबई कार्यालयाकडे ०६ स्थायी व ०४ कंत्राटी असे एकूण १० कर्मचारीकार्यरत आहेत. त्यातील ०३ स्थायी व०३ कंत्राटी असे एकूण०६ कर्मचारी शिर्डी येथे वर्ग करणेबाबत तसेच मुंबई कार्यालयाकडील साईलीला द्वैमासिकाचे कामकाज शिर्डी येथे वर्ग करणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०२/२०१५ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर समितीने निर्णय क्रं.४३ खालील प्रमाणे घेतलेला आहे.

संस्थानचे मुंबई कार्यालयाकडील कर्मचा-यांचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत सदरहू कार्यालयाच्या गरजेनुसार कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा, असे ठरले.

त्यानुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/६०२३/२०१५, दिनांक २९ मार्च, २०१५ रोजीच्या आदेशाने मुंबई कार्यालयाकडील श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक व श्री.किशोर केशव क्षिरसागर, लिपीक-टंकलेखक यांची बदली शिर्डी कार्यालयाकडे करण्यात आलेली आहे. श्री.क्षिरसागर यांनी त्यांच्या अर्जात, सध्या मुंबई कार्यालयात कार्यरत असलेल्या एकूण ०६ कायम कर्मचा-यांपैकी ०३ कर्मचारी येत्या ०३ ते ०६ महिन्यांत सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे तेथील कामे नीट पार पाडण्यासाठी येथे कर्मचा-यांची नितांत आवश्यकता असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु मुंबई कार्यालयाचे प्रअधिक्षक श्री.रामचंद्र बाबु दर्गे हे दिनांक३०/०६/२०१५ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर डिसेंबर २०१५ अखेरपर्यंत तेथील कोणतेही कर्मचारी सेवानिवृत्त होणार नाहीत.

उपरोक्त वस्तूस्थितीनुसार आस्थापना विभागाच्या दिनांक ०८/०४/२०१५ रोजीच्या मंजूर टिपणी अन्वये श्री.क्षिरसागर यांची बदली स्थगित करणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली होती व तसे त्यांना जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ १८७/ २०१५, दिनांक११ एप्रिल,२०१५ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

त्यानंतर श्री.किशोर केशव क्षिरसागर, लिपीक-टंकलेखक यांनी संस्थानविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ४१२१/२०१५ ही कोर्ट केस दाखल केलेली आहे. संस्थानने सदर रिट पिटीशनमध्ये रिप्लाय ॲफिडेव्हीट कोर्टात दाखल केलेले आहे. त्यावर दिनांक २१/०७/२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश कामगार विभागाने जा.क्र.एसएसएस/वशी-०७ए/१६२०/२०१५, दिनांक ३० जुलै, २०१५ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

श्री.क्षिरसागर यांचे दि.०१/०४/२०१५ रोजीचे अर्जास दि. ११/०४/२०१५ रोजीचे पत्राने उत्तर दिले असून त्यांचा अर्ज नामंजुर करणेत आलेबाबत कळविणेत आलेले आहे असे मा. उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले आहे. तथापी, मा. उच्च न्यायालयाने श्री. क्षिरसागर यांचा दि.०१/०४/२०१५ रोजीचा अर्ज संस्थानकडे प्रलंबीत असून त्यांचे आईचे कॅन्सरचे आजारपण व इतर संबंधित मुद्दयांचा मात्रिसदस्यीय समितीने कायदयानुसार विचार करणे गरजेचे आहे. सदरचे अर्जावर आजपासून सहा आठवडयात मा.त्रिसदस्यीय समितीने लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

दि. २८/०४/२०१५ रोजीचे स्टेटस को बाबतचा आदेश त्यांचे दि.०१/०४/२०१५ रोजीचे अर्जावर निर्णय होईपर्यंत व त्यांनतर दोन आठवडे लागु राहिल, जर निर्णय तक्रारदारचे विरोधात असला तर कायदयानुसार तक्रारदारांच्या सर्व विनंत्यांचा विचार करावा, असा आदेश करुन मा. उच्च न्यायालयाने सदर रिट पिटीशन ॲप्लिकेशनसह निकाली काढले आहे.

तरी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री.किशोर केशव क्षिरसागर, लिपीक-टंकलेखक यांचे दि ०१/०४/२०१५ रोजीचे बदलीबाबतचे अर्जावर मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८२** **उपरोक्त प्रस्तावावर पुढीलप्रमाणे चर्चा झाली.**

**प्रशासनाला कामकाजाच्या सोयीनुसार कर्मचा-याची कोठेही समकक्ष पदावर बदली करण्याचे पूर्ण अधिकार आहेत व एकाच ठिकाणी काम करण्याचा कर्मचा-यांना कोणताही हक्क् नसतो, याबाबत नियुक्ती आदेशामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला असतो. तरीही श्री.क्षीरसागर यांनी त्यांची बदली स्थगित करणेबाबत प्रशासनाला विनंती केली होती. त्यावर सामान्य प्रशासन विभागाने सर्व दृष्टीने विचार करुन श्री.किशोर केशव क्षीरसागर, यांना त्यांची बदली स्थगित करण्याची विनंती अमान्य करणेत आलेली आहे, असे दि.११.०४.२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविलेले होते. परंतु मा.उच्च न्यायालयाच्या प्रस्तावित आदेशामुळे समितीने या विषयावर पुनर्विचार केला की, साईलिला मासिकाचे काम शिर्डी कार्यालयाकडे हलवण्यात आलेले आहे त्यामुळे आता मुंबई कार्यालयास जास्तकर्मचा-यांची आवश्यकता नाही.**

**श्री.क्षीरसागर यांच्या आई-वडीलांच्या आजाराविषयीही सहानूभूतीपुर्वक विचार केला असता, संस्थानचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कार्यान्वित असून त्यामध्ये कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबीतांवर विनामुल्य उपचार केले जातात. तसेच संस्थान रुग्णालयाव्यतिरिक्त बाहेरुन औषधे घ्यावी लागल्यास अथवा इतर रुग्णालयामध्ये उपचार घेतल्यास त्या खर्चाची प्रतीपूर्ती संस्थानमार्फत करण्यात येते. त्याकरीता श्री.क्षीरसागर यांच्या आई-वडीलांची हॉस्पिटलविषयी कोणतीही असुविधा होणार नाही, असे समितीचे मत आहे. सबब श्री.किशोर केशव क्षीरसागर, लिपीक-टंकलेखक यांची बदली स्थगित करणेबाबतची विनंती अमान्य करणेत आली व याबाबत त्यांना तात्काळ कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.११** **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी क्रेन, जेसीबी, डंपर इ. वाहने भाडोत्री लावणे व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सिहस्थ कुंभेमळा कालावधीमध्ये संरक्षण विभागाकडील परिपत्रकानुसार व दि०६/०७/२०१५ रोजीचे मंजर टिपणीनुसार, कुंभमेळा कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी हाड्रोक्रेन-०१, LMV क्रेन-०१, डंपर-०२, जे.सी.बी.-०३ (एक ऑन कॉल) इ.वाहने भाडोत्री तत्वावर लावणेकामी इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/१९९८/२०१५ दि.०९/०७/२०१५ रोजीचे पत्राने परिसरातील क्रेनधारकांकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेली ०६ दरपत्रके मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेनुसार दि२९/०७/२०१५ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेली आहेत. सदर दरपत्राकामध्ये देवु केलेल्यादरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ. नं. | दरपत्रक धारक | जे.सी.बी. (२४ तास) | | हाड्राक्रेन (२४ तास) | | L.M.V.क्रेन (स.०६ ते रा.१०) | | डंपर (२४ तास) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्टॅडींग दर | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टॅडींग दर | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टॅडींग दर | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टॅडींग दर | प्रत्यक्ष वापराचे दर |
| | | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास |
| १. | त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, बाभळेश्वर | 4399.00 | 699.00 | **4221.00** | **521.00** | **1211.00** | **4111.00** | 2950.00 | 19000.00 |
| २. | गुरुदत्त क्रेन सर्व्हिस, राहाता | 5550.00 | 750.00 | 4350.00 | 650.00 | 5300.00 | 6600.00 | 4000.00 | 20000.00 |
| ३. | समृध्दी क्रेन सर्व्हिस, शिर्डी | ---- | ---- | 5500.00 | ---- | ---- | ---- | ---- | ---- |
| ४. | ओम गुरुदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगाव | ---- | ---- | 7000.00 | ---- | 4500.00 | ---- | ---- | ---- |
| ५. | के.आर.वाबळे, रुई | **251.00** | **551.00** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- |
| ६. | संतोष ज्ञानेश्वर उदावंत शिर्डी-नांदुर्खी रोड | 9600.00 | 650.00 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचारकरता, कुंभमेळा-२०१५ मधील चार पर्वणीचे (अगोदरचे-०२ दिवस मुख्य दिवस-०१ नंतरचे-०२ दिवस एकुण-०५ दिवसाप्रमाणे) एकुण २० दिवस गर्दीच्या कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी एक जेसीबी मशिनकरीता देवु केलेले न्युनतम दरधारक, के.आर.वाबळे, रा. रुई यांचे स्टॅडींगसाठी (उभे ठेवणे) दर प्रति दिन (२४ तास) रु.२५१/- मात्र व प्रत्यक्ष वापरासाठीचे प्रति तास रु.५५१/- मात्र, एक हाड्राक्रेन, व एक LMVक्रेन करीता देवु केलेले न्युनतम दरधारक, त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, बाभळेश्वर यांचे हाड्राक्रेनकरीता स्टॅडींगसाठी (उभे ठेवणे) दर प्रति दिन (२४ तास) रु.४,२२१/- मात्र व प्रत्यक्ष वापरासाठीचे प्रति तास रु.५२१/- मात्र, LMV क्रेन

करीता स्टॅंडींगसाठी (उभे ठेवणे) दर प्रति दिन (०६ ते २२ या वेळेत १६ तास) रु.२११/- मात्र व प्रत्यक्ष वापरासाठीचे प्रति दिन (०६ ते २२ या वेळेत १६ तास) रु.४,१११/- मात्र स्विकारणेत येवुन त्यांना कार्यादेश देणे योग्य होईल.

तसेच डंपर करीता दोनच कोटेशनधारकांनी दर देवु केलेले असलेने डंपर करीता पुन्हदरपत्रके मागविण्यात आलेली व प्राप्त झालेली तिन दरपत्रके मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने मा. प्रशासकीय अधिकारी (वाहन विभाग) यांचे समोर उघडण्यात आलेली आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | दरपत्रक धारक | डंपर | | |
|---|---|---|---|---|
| | | स्टॅंडींग दर | प्रत्यक्ष वापराचे दर | |
| | | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन |
| १. | त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, बाभळेश्वर | **2950.00** | **792.00** | **19000.00** |
| २. | गुरुदत्त क्रेन सर्व्हिस, राहाता | 3,500.00 | 812..00 | 19,500.00 |
| ३. | भगवान क्रेन सर्व्हिस, राहुरी | 3,600.00 | 833.00 | 20,000.00 |

सदरचे सर्व वाहनांचे (जे.सी.बी., हाड्राक्रेन, LMV क्रेन, डंपर) दर हे २४ तासासाठी (उभे ठेवणे) व प्रत्यक्ष वापर झाल्यास प्रती तास याप्रमाणे मागविण्यात आलेले आहेत. त्यात उपरोक्त पैकी कोणत्याही वाहनाचा (जे.सी.बी., हाड्राक्रेन, LMV क्रेन, डंपर) आवश्यकतेनुसार वापर झाल्यास झालेल्या प्रत्यक्ष वापराचे बिल प्रती तासी उपरोक्त नमुद केलेल्या दरानुसार अदा करणेत येईल व सदरचे प्रत्यक्ष वापर झालेले तास हे प्रती दिनी (२४ तासासाठी) नमुद करण्यात आलेल्या २४ तासामधून वगळून उर्वरीत तासांचे बिल संबंधीत न्युतम दरधारकांस अदा करणेत येईल.

तरी उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचारकरता, कुंभमेळा-२०१५ मधील चार पर्वणीचे (अगोदरचे-०२ दिवस मुख्य दिवस-०१ नंतरचे-०२ दिवस एकुण-०५ दिवसाप्रमाणे) एकुण २० दिवस गर्दीच्या कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी दोन डंपर करीता देवु केलेलेन्युनतम दरधारक, त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, बाभळेश्वर यांचे स्टॅंडींगसाठी (उभे ठेवणे) दर प्रति दिन (२४ तास) रु.२९५०/- मात्र व प्रत्यक्ष वापरासाठीचे प्रति दिन (२४ तास ) करीता रु.१९,०००/- मात्र स्विकारणेस व न्युनतमदरधारकांना कुंभमेळा- २०१५ चे आपत्ती व्यवस्थापन विभाग यांना आवश्यकतेनुसार क्रेन, जे.सी.बी. व डंपर इ. वाहने भाडोत्री लावणे बाबत कार्यादेश देणेस व सदर कामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२८३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ चे कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी क्रेन, जेसीबी, डंपर इ. वाहने भाडोत्री लावणेकामी विहीत पध्दतीने केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहूकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे संबंधीतनिम्नतम दरधारकास नाशिक येथील प्रत्येक शाही स्नानाच्या अगोदरचा ०१ दिवस व नंतरचे ०२ दिवस अशा प्रकारे आवश्यकतेनुसार कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.१२** **सन २०१५-१६ करीता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी फेर निविदा प्रकियेबाबत.**

**विषय नं.१३** **गाईचे गावरान तुप खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२८४** **उपरोक्त विषय नं.१२ व १३ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.१४** **दि.०९.०८.२०१५ रोजी संस्थानचे दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिक्षक व इतर ३७ पदांसाठी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकिट उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचा दि १३/०८/२०१३ व दि. १७/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिक्षक व इतर 37 पदे भरणेसाठी मान्यता मिळाली होती. त्यानुसार संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार विविध पदांसाठी अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्ज मा डीन, बीजेएमसी, पुणे यांचेकडून पडताळणी करुन पात्र उमेदवारांना दि.०९/०८/२०१५ रोजी मुलाखतीसाठी साईनिवास गेस्ट हाऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे बोलविणेत आले होते. तसेच सदर उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी मा न्यायालयाचे आदेशानुसार डीन, गवर्हनमेंट मेडीकल कॉलेज, संबंधीत विषयातील तज्ञ तसेच सिव्हील सर्जन, अहमदनगर यांना आमंत्रित करणेत आले होते.

मा.न्यायालयाचे आदेशानुसार निवड समितीसमोर दि ०९/०८/२०१५ रोजी श्री साईनिवास गेस्ट हाऊस, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेणेत आल्या. सदर मुलाखतीचे व्हिडीओ चित्रीकरण करणेत आलेले आहे. मुलाखती संपुष्टात आल्यानंतर डीन, बीजेएमसी, पुणे व सिव्हील सर्जन, अहमदनगर यांनी घेतलेल्या मुलाखतीचा निकाल व्हिडीओ चित्रीकरणासमोर पाकीटात सिल केला आहे.

तरी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकीट उघडणेस तसेच निवड झालेल्या अर्जदारांना नेमणूक आदेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८५** **संस्थानच्या दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिक्षक व इतर ३७ पदे भरतीबाबतच्या मुलाखतीसंबंधीचे बंद पाकिट आजचे सभेसमोर उघडणेत आले. उमेदवारांना मिळालेले गुण, त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, रिक्त पदे या सर्व गोष्टींचा त्री-सदस्यीय समितीने बारकाईने अभ्यास केला व ज्या पदांसाठी लायक उमेदवार मिळाले त्यांची त्या संबंधीत पदावर निवड करुन, निवडलेल्या उमेदवारांची यादी ताबडतोब संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली.**

**संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या यादीमधील अ.नं.२,४,५, ६,७,८, १०,१२,१३, १५,१७,१९, २०,२१,२२,२३, २४,२५, व २७ या पदांसाठी योग्य व लायक उमेदवार मिळालेले नसल्यामुळे सदरहू पदे रिक्त ठेवण्यात आलेली आहेत. तसेच अ.नं.३,९,११,१४,२६,३०,३१ व ३६ या पदांच्या काही तांत्रिक बाबींकरिता गोपनीय अहवाल शासनास पाठविणेच्या सुचना केल्या व तोपर्यंत सदर पदाच्या नेमणूकीविषयीचा निर्णय स्थगित ठेवणेत आला व तसे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आले.**

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, निवड समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात यावा. तसेच निवड समितीच्या शिफारशीनुसार ज्या पदासाठी योग्य व लायक उमेदवार मिळाले नाहीत, त्या पदांसाठी पुन्हाजाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१५** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिक्षक व इतर ३७ पदे भरणेसाठी मुलाखती घेणेकामी मा.उच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या समितीचे सदस्यांना तसेच संबंधीत विषयातील तज्ञांचे मानधनाबाबत**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचा दि १३/०८/२०१३ व दि. १७/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिक्षक व इतर 37 पदे भरणेसाठी मान्यता मिळाली होती. त्यानुसार संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. मा.न्यायालयाने आदेशानुसार मुलाखती घेणेकामी निवड केलेल्या तज्ञांना प्रत्येकी रु. ५०००/- याप्रमाणे मानधन देणेकामी एच आर विभाग, रुग्णालये दि. १७/०७/२०१५ रोजीची मंजुर टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे.

मा.न्यायालयाचे आदेशानुसार उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ १२५५/ २०१५ दि.२९/०७/२०१५ व जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/१२५८/२०१५ दि. ३०/०७/२०१५ अन्वये डीन बीजेएमसी, पुणे तसेच सिव्हील सर्जन अहमदनगर व संबंधीत विषयातील तज्ञांना आमंत्रित करणेत आले होते.

निवड केलेल्या समितीने सुचविलेनुसार दि ०९/०८/२०१५ रोजी साईनिवास गेस्ट हाऊस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे उमेदवारांच्या मुलाखती घेणेत आल्या. सदर मुलाखती घेणेकामी सोबतचे यादीनुसार डीन बीजेएमसी, पुणे तसेच सिव्हील सर्जन अहमदनगर व संबंधीत विषयातील तज्ञ उपस्थित होते. सदर निवड समितीला त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे मानधन देण्यात आले आहे. मानधनाचा एकुण खर्च रु.१,०६,०००/- तसेच मा डीन सो यांना पुण्यहून येण्याजाण्यासाठी वाहनखर्च, चहा नाष्टा, जेवण यासाठी रु.७०००/- तसेच संबंधित विषयातील तज्ञांना चहा, नाष्टा, जेवण यासाठी रु ५०००/- असा एकुण रु १,१८,०००/- खर्च आलेला आहे.

तरी मा.न्यायालयाचे आदेशानुसार मुलाखत घेणेकामी निवड केलेल्या समितीला दिलेल्या एकुण रु.१,१८,०००/- खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व रु.१,१८,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१६** **Que Management कार्यप्रणालीच्या सादरीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.२८७** श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या गर्दीचे व्यवस्थापन व त्यांचे वेळेचा सदुपयोग व्हावा यासाठी साईटेक प्रकल्पातंर्गत दर्शनपास (Que Management) कार्यप्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी विकसीत केलेली असून त्यावर मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य यांचेबरोबर तोंडी चर्चा झाली असता, मा.जिल्हाधिकारी सो यांनी तिरुपती देवस्थान येथे दर्शनपास (Que Management) प्रणाली विकसीत केलेल्या मे.त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम्स इंडीया प्रा.लि., बॅंगलोर यांना दर्शनपास (Que Management) कार्यप्रणालीचे सादरीकरण करणेसाठी त्रीसदस्य समितीचे सभेसमोर बोलविणेबाबत निर्देश दिले होते.

त्यानुसार आजचे सभेसमोर मे.त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम्स इंडीया प्रा.लि., बंगलोर चे संचालक श्री. श्रीनिवास राव हे उपस्थित होते. त्यांनी भारतातील तिरुपती देवस्थान, वैष्णव देवी, बाबा अमरनाथ अशा अनेक देवस्थानच्या ठिकाणी ही कार्यप्रणाली विकसीत केलेली असून त्या धर्तीवर शिर्डी येथे तयार करावयाच्या दर्शनपास प्रणालीचे सादरीकरण सभेस दाखविले व सभेने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. याप्रणालीमध्ये आवश्यक असलेले संगणक, प्रिंटर, प्रिंटींगसाठी लागणारे कागद इतर अनुषंगीक तांत्रिक संगणकीय साहित्य व मनुष्यबळ हे सर्व त्यांचेच राहिल. साईभक्तांना देण्यात येणा-या प्रत्येक कार्डमागे संबधीत कंपनी सरकारी योजनांची जाहिरात करणार आहे व त्यामागे त्यांना भारत सरकारकडून त्याचा मोबदला मिळणार असल्याने सदरहु काम ते विनामुल्य करणार आहेत. संस्थानमार्फत फक्त त्यांना जागा, विज व कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन द्यावी लागेल, अशी माहिती त्यांनी सभेस दिली.

उपरोक्त सादरीकरणावर अशी चर्चा झाली की, दर्शनपास कार्यप्रणालीमध्ये साईभक्तांना मिळणा-या दर्शनपासवर दर्शनासाठी जाण्याची वेळ असणार आहे. त्यामुळे साईभक्त नेमून दिलेल्या वेळेतच दर्शनासाठीच्या गेटवर जातील व अनावश्यक गर्दी होणार नाही, यामुळे साईभक्तांच्या वेळेची बचत होईल व गर्दीचेही व्यवस्थापन होऊ शकेल. याकरीता मे.त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम्स इंडीया प्रा.लि., बंगलोर यांनी इतर देवस्थानच्या ठिकाणी बसविलेल्या दर्शनपास (Que Management) कार्यप्रणालीची प्रत्यक्ष पाहणी करावी व त्या देवस्थानसोबत केलेल्या कराराचा अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव त्या करारासह सभेसमोर सादर करावा.

तसेच दर्शनपास (Que Management) कार्यप्रणाली राबविणेसाठी सदरहु कंपनीला संस्थान परिसरातील वेगवेगळया ठिकाणी जागा, वीज व कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन देणेबाबत. व त्यांचे अधिकारी, कर्मचारी यांचेकरीता निवास, भोजनाची विनामुल्य व्यवस्था करणेचाही उल्लेख सदरहु प्रस्तावामध्ये करणेत यावा.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र.२८८** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्र.नप/ टे.क्रं.८/ २३४/ २०१५, दि.२०.०८.२०१५ रोजीचे पत्रान्वये सुक्या कच-यातील प्लास्टिकपासून ग्रॅन्यूअल्स तयार करणेसाठी मशीन, शेड उभारणीकामी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे. या पत्रावर चर्चा करणेसाठी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हे सभेमध्ये उपस्थित होते. त्यांनी, प्लास्टिक कचरा गोळा करणे, मशिनची दुरुस्ती देखभाल करणे, सदरहू प्रकल्प चालविणे या सर्व गोष्टी नगरपंचायत शिर्डीमार्फत करणेत येईल, अशी माहिती सभेस दिली.

यावर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये शिर्डी येथे प्रचंड प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे व त्यावेळेस प्लास्टीक कचराही मोठया प्रमाणात जमा होणार असून त्यामुळे शिर्डीतील नागरीक व येणारे साईभक्त यांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर प्लास्टिक कचरा नष्ट करणेचा प्रकल्प उभारणे जरुरीचे आहे, असे समितीचे मत झाले.

त्यामुळे सदरहू प्रकल्प उभारणेस मान्यता घेणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेत यावा व मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्जही दाखल करणेत यावा. तसेच या दरम्यान प्रस्तावितकामी येणारा खर्च कोणी देणगीदार उचलणेस तयार आहे का, याचीही शहानिशा करणेत यावी. (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

वरील निर्णय क्र.२७३ ते २८८ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-**XXX** | स्वाक्षरित/- **XXX** | स्वाक्षरित/- **XXX** |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी